पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478




**प्रेसनोट क्रमांक -** **दिनांक - ०९/०८/२०२६**

गुन्हे शाखा, पुणे शहर

## ऐरोस्पेस मॉलमध्ये नियमबाह्य पद्धतीने व्यवसाय सुरू असल्याने बारवर छापा कारवाई केलेबाबत

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक ०९/०८/२०२६ रोजी पहाटे ०३/२० वा.चे सुमारास विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीतील ऐरोस्पेस मॉल येथील The House Commune Bar & Eatery या आस्थापनेवर छापा कारवाई केली आहे.

सदर ठिकाणी आस्थापना नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित इसमांविरूद्ध विमानतळ पोलीस स्टेशन येथे **भा.न्या.सं.क. २२३, ३(५), महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६८, ७७, ८२, ८३, तसेच संबंधित ध्वनी/इलेक्ट्रॉनिक सिग्नेचर कायद्यातील कलम ४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३(w), नियम १३१** अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरवेळी अंदाजे १,६७,०००/-रु.किं.ची दारु व अंदाजे ७५,०००/-रु.किं.चे साऊंड सिस्टीम जप्त करण्यात आलेले आहे.

सदर कारवाई दरम्यान १)सुमित रोहिदास गोटे वय ३० वर्षे रा. येरवडा पुणे २)नूर हुसेन शेख वय ३० वर्षे रा. विमाननगर पुणे ३) सोनाली विलास पंडित वय ३२ वर्षे रा. उंड्री पुणे ४) मंगेश उत्तम धिमधीमे रा. धानोरी पुणे ५) अनिकेत निवृत्ती मांडकीकीर वय २१ वर्षे रा.धानोरी पुणे ६) सुनीता जैन वर्मा वय २५ वर्षे रा. लोहगाव पुणे ७) अनंत जगल गायकवाड वय ३१ वर्षे रा. खडकी पुणे ८) शाहनूर अमीनुद्दीन काझी वय ३५ वर्षे रा. बिबवेवाडी ओटा पुणे यांना अटक करण्यात आली आहे.

सदर कारवाईच्या वेळी आस्थापनेमध्ये एकूण ८९ ग्राहक उपस्थित होते. त्यामध्ये ६३ पुरुष व २६ महिला यांचा समावेश होता.

सदर कारवाई गुन्हे शाखा, पुणे शहर यांच्या पथकाने केली असून, आस्थापनेमध्ये नियमांचे उल्लंघन करून व्यवसाय सुरू ठेवणा-या संबंधितांविरूद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्रीमती तेजस्वी सातपुते, मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री.गौहर हसन, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-३ श्री.शंकर खटके यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अविनाश माने, पोलीस निरीक्षक श्री.जीवन माने, पोलीस निरीक्षक श्रीमती तृप्ती सोनवणे यांचे सुचनांप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक पवार, पोलीस उप-निरीक्षक जाधव, पोलीस उप-निरीक्षक चौगुले, पोलीस अंमलदार सरगर, चव्हाण, मंडलिक, नेवसे, तारु, तुपसुंदर, शिंदे, राठोड, खराडे, साबळे, केगले, रणपिसे, रेणुसे, राठोड, बांदल, शेलार यांनी केली आहे.